आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१८ मे २०२६ - सोमवार

**ठळक बातम्या**

- पाच देशांच्या दौऱ्यादरम्यान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी नॉर्वेला पोहोचले

- केरळचे नवे मुख्यमंत्री म्हणून व्ही. डी. सतीशन यांचा शपथविधी

- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या १६ जागांसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीचं वेळापत्रक जाहीर; १८ जूनला मतदान आणि २२ जूनला मतमोजणी होणार

- नीट पेपरफुटीप्रकरणी ट्यूशन क्लास चालक शिवराज मोटेगावकर यांना लातूर इथून अटक

**आणि**

- उत्तरप्रदेशात लखिमपूर खेरी जिल्ह्यात रस्ते अपघातात ९ जणांचा मृत्यू

**<><><><><>**

पाच देशांच्या दौऱ्यावर असणारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज नॉर्वेची राजधानो ऑस्लो इथे पोहोचले. या दौऱ्यात भारत - नॉर्वे द्विपक्षीय संबंधांवर चर्चा होणार असून तिसरी भारत-नॉर्डिक शिखर परिषदही होणार आहे. भारतीय प्रधानमंत्र्यांचा गेल्या ४३ वर्षातला हा पहिलाच नॉर्वे दौरा आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या स्वीडन दौऱ्यात गुटेनबर्ग इथं युरोपियन उद्योजकांसोबतच्या गोलमेज परिषदेला संबोधित केलं. गुंतवणूक, नवोन्मेष आणि उत्पादन यासाठी भारत हे जगातलं आकर्षक ठिकाण आहे, असं त्यांनी सांगितलं. ग्रीन हायड्रोजन मिशन, स्वच्छ ऊर्जा यासारख्या भारतातल्या महत्त्वाकांक्षी योजनांमध्ये सहभागी होण्याची मोठी संधी स्वीडनमधल्या अनेक कंपन्यांसाठी उपलब्ध असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. भारताची रिफॉर्म एक्सप्रेस पूर्ण गतीनं आगेकूच करत असून संस्थात्मक प्रणाली सारख्या उपाययोजनाही लवकरच केल्या जातील, असं आश्वासन त्यांनी दिलं. स्वीडनचे प्रधानमंत्री उल्फ क्रिस्टरसन आणि युरोपियन युनियनच्या अध्यक्षा उर्सुला फॉन डेर लेयन यावेळी उपस्थित होते.

प्रधानमंत्री  मोदी यांना द्विपक्षीय संबंधांमधल्या त्यांच्या योगदानाबद्दल आणि दूरदर्शी नेतृत्वाबद्दल रॉयल ऑर्डर ऑफ द पोलर स्टार कमांडर ग्रँड क्रॉस हा स्वीडनचा सर्वोच्च सन्मान प्रदान करण्यात आला.

<><><><><>

केरळमध्ये संयुक्त लोकशाही आघाडीचे मुख्यमंत्री म्हणून काँग्रेसचे व्ही. डी. सतीशन यांनी आज शपथ घेतली. थिरुवनंतपुरममध्ये राज्यपाल राजेन्द्र आर्लेकर यांनी त्यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली.  सतीशन यांच्या सोबत वीस जणांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. यामध्ये वरिष्ठ काँग्रेस नेते रमेश चेन्नीथला, के. मुरलीधरन, ए.पी अनिलकुमार  तसंच केरळ प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष सनी जोसेफ यांचा समावेश आहे. मुस्लिम लीगचे पी. के. कुनहलीकुट्टी, आरएसपी नेते शिबू बेबी जॉन, केरळ काँग्रेसचे मॉन्स जोसेफ, केरळ काँग्रेस जेकबचे अनुप जेकब आणि सीएमपीचे सी.पी. जॉन यांनीही शपथ घेतली.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, नेते राहूल गांधी तसंच प्रियांका गांधी वड्रा त्याचबरोबर काँग्रेसशासित राज्यांचे मुख्यमंत्री शपथविधीला उपस्थित होते. केरळचे माजी मुख्यमंत्री पिनराई विजयन यांच्यासह माकपचे आणि भाजपाचे नेतेही शपथविधीला उपस्थित होते.

केरळ विधानसभेच्या ९ एप्रिलला झालेल्या निवडणुकीत संयुक्त लोकशाही आघाडी १०२ जागांवर विजयी झाली होती.

<><><><><>

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आज व्हिएतनाम आणि दक्षिण कोरिया या दोन देशांच्या भेटीसाठी रवाना झाले. दोन्ही देशांबरोबरचे द्विपक्षीय संबध दृढ होण्याच्या दृष्टीने हा दौरा असल्याचं राजनाथ सिंह यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. धोरणात्मक लष्करी सहकार्याची व्याप्ती, संरक्षण उद्योगातली भागीदारी, सागरी सहकार्य वाढवण्यावर तसंच भारतीय प्रशांत क्षेत्रात शांतता आणि स्थैर्याला चालना देणं यावर या भेटीत भर दिला जाईल असं सिंह यांनी आपल्या संदेशात नमूद केलं आहे.

<><><><><>

छत्तीसगढमधे रायपूर इथं डायल ११२ या सेवेचा विस्तार केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते आज झाला. याआधी राज्याच्या १६ जिल्ह्यांमध्ये उपलब्ध असणारी ही सेवा

आता सर्व ३३ जिल्ह्यांमध्ये उपलब्ध होईल. अमित शाह यांनी आज या सेवेअंतर्गत ४०० वाहनांना झेंडा दाखवला.

<><><><>

नीट यूजी पेपरफुटी प्रकरणी महाराष्ट्रात लातूर शहरातल्या रेणुकाई केमिस्ट्री क्लासेस चालवणाऱ्या शिवराज मोटेगावकर या संचालकाला सीबीआयने अटक केली आहे. काल या प्रकरणाच्या चौकशीत मोटेगावकर यांच्या मोबाईल फोनमध्ये नीट परीक्षेची फुटलेली प्रश्नपत्रिका सापडली होती. त्यामुळे आज अटकेची कारवाई करण्यात आली. या प्रकरणात सहभागी असणाऱ्या टोळीचे मोटेगावकर हे सक्रिय सदस्य आहेत असं सीबीआयने म्हटलं आहे. मोटेगावकर यांनी इतर आरोपींशी संगनमत करून २३ एप्रिल रोजी होणाऱ्या परीक्षेपूर्वी ही प्रश्नपत्रिका मिळवली होती, असं सीबीआयने म्हटलं आहे.

<><><><>

आजच्या आंतरराष्ट्रीय महिला सागरी दिनानिमित्त केंद्रीय बंदरं , जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी महिला खलाशांना शुभेच्छा दिल्या आहेत. देशाच्या धोरणांमधल्या परिवर्तनामुळे महिला खलाशांचं प्रमाण वेगानं वाढत आहे, असं त्यांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात नमूद केलं आहे. नारी शक्तीनं आघाडी घेतली असून देशाच्या विकासाला आणि जागतिक सागरी क्षेत्राला उज्ज्वल, समावेशक भविष्याच्या दिशेनं घेऊन जायला ती सज्ज झाली आहे, असं ते म्हणाले.

<><><><>

केंद्रीय निवडणूक आयोगानं महाराष्ट्र विधान परिषदेच्या १६ जागांसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीचं वेळापत्रक जाहीर केलं आहे. स्थानिक स्वराज्य संस्थामधून निवडून द्यायच्या सोलापूर, अहिल्यानगर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, रायगड- रत्नागिरी- सिंधुदुर्ग, नाशिक, वर्धा- चंद्रपूर- गडचिरोली, अमरावती, धाराशिव- लातूर- बीड, परभणी- हिंगोली आणि छत्रपती संभाजीनगर- जालना या १६ मतदारसंघांमधल्या सदस्यांचा कार्यकाळ संपल्यानं ही निवडणूक होणार आहे. यासोबतच चंद्रशेखर बावनकुळे हे विधानसभेत निवडून आल्याने त्यांनी विधान परिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या एका जागेसाठीही निवडणूक होणार आहे.

याबाबतची अधिसूचना येत्या २५ तारखेला जारी होईल. १ जूनपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील, तर ४ जूनपर्यंत उमेदवारी मागे घेता येईल. मतदान १८ जून रोजी होणार असून २२ जूनला मतमोजणी होईल. याबरोबरच संबंधित क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

<><><><><>

उत्तर प्रदेशात लखिमपूर खेरी जिल्ह्यात आज सकाळी झालेल्या रस्ते अपघातात ९ जणांचा मृत्यू झाला. ट्रकने समोरून येणाऱ्या प्रवासी वाहनाला जोराची धडक दिल्याने हा अपघात झाला. या वाहनात दहा जण प्रवास करत होते. अपघाताची तीव्रता इतकी होती की यातल्या ९ जणांचा जाग्यावर मृत्यू झाला. तर एका जखमीला पोलिसांनी रुग्णालयात दाखल केलं आहे. अपघातानंतर ट्रकचालक पळून गेला.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीमधून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी दोन लाख रुपये मदत जाहीर केली आहे. तसंच जखमींना उपचारासाठी ५० हजार रुपये मदत देण्यात येणार आहे.

<><><><><>

दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर आज दहशतवादविरोधी मॉक ड्रील आयोजित केलं गेलं. उप महानिरिक्षक तसंच हवाई दलाचे मुख्य सुरक्षा अधिकारी, सीआयएफएसचे अधिकारी यांच्या उपस्थितीत हे मॉकड्रिल झालं. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाचे जवान, दिल्ली पोलीस, राष्ट्रीय सुरक्षा जवान, बाँबरोधी पथक तसंच इतर दलांच्या कर्मचाऱ्यांनी या ड्रिलमध्ये भाग घेतला होता. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाने समाजमाध्यमावरच्या संदेशात ही माहिती दिली आहे.

<><><><><>

अमेरिकेत इडाहो इथे काल एअर शो सुरु असताना दोन ईए १८ जी ग्रोवलर लष्करी विमानांची टक्कर झाली. विमानातल्या चारही जणांना वाचवण्यात यश आलं. घटनेची चौकशी सुरु असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

<><><><><>

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी इराणला दिलेल्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर अमेरिका आणि इराणमधला तणाव अधिक वाढल्याचं वृत्त आहे. इराणने वेळ वाया न

घालवता करार करण्याकडे लक्ष द्यावं असं ट्रंप यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहं. वाटाघाटी पुन्हा सुरु करण्यासाठी अमेरिकेने इराणला ४०० किलो समृद्ध युरेनियम अमेरिकेला सुपूर्द करणे, एकाच ठिकाणचा अणुकार्यक्रम सुरु ठेवणे या अटी घातल्या आहेत. चर्चेसाठी या अटी नाकारत इराणने आपल्या प्रदेशातल्या तसंच संघर्षाच्या नुकसानभरपाईसोबतच लेबनॉनमधल्या लष्करी हालचाली थांबवण्यासह, होर्मुझच्या सामुद्रधुनीवर आपला ताबा अशा काही गोष्टींचा आग्रह धरला आहे. चर्चेसाठीच्या अमेरिकेच्या मुख्य अटी इराणने उघड केल्यानंतर लगेचच ट्रंप यांनी हा संदेश दिला आहे. इराण आणि अमेरिका या दोन्ही देशांनी गेल्या आठवड्यात एकमेकांचे चर्चेसाठीचे प्रस्ताव फेटाळल्यानंतर संघर्षाला पूर्णविराम देण्यासाठीचे प्रयत्न पुढे सरकलेले नाहीत.

**//<><><><><>//**